
# महाराष्ट्र कारागृह वार्तापत्र



*माहे मे-२०१८, अंक - ५८ वा, पुणे*




***"कारागृह विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा"***

## *संपादकीय संदेश*

कारागृहे बंदयांना केवळ बंदीस्त करुन ठेवण्यासाठीच आहेत, असा ब-याच घटकांचा समज आहे. मात्र कारागृह विभागाचे **"सुधारणा व पुनवर्सन"** या ब्रीदवाक्यानुसार येथे बंदयांचे कौशल्य/आवड व कार्यक्षमता ओळखुन त्यांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी करुन घेतले जाते. यामध्ये प्रामुख्याने शेती व कारागृह विभागातील विविध उद्योगात रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. यामुळे बंदयांचे ख-या अर्थाने **"सुधारणा व पुनवर्सन"** होत आहे.

महाराष्ट्रातील एकुण ५४ कारागृहापैकी २९ कारागृहात शेती उद्योग सुरु असुन सन २०१७-१८ मध्ये सरासरी ८१५ पुरुष व ३५ स्त्रीया असे एकुण ८५० बंदयांना रोजगार मिळालेला आहे. शेती उद्योगामुळे कारागृह विभागात सातत्याने उत्पादनात वाढ होत आहे. आता पर्यंत सर्वाधिक सन २०१७-१८ मध्ये ३.८६ कोटी उत्पादन मिळालेले आहे.

शासनामार्फत कारागृह शेतीचे आधुनिकीकरण योजनेअंतर्गत दरवर्षी अनुदान उपलब्ध होत असुन सन २०१२-१३ पासून आतापर्यंत १.७३ कोटी अनुदानातुन ट्रॅक्टर, अवजारे, विद्युत पंप इत्यादी साधनसामग्री खरेदी करण्यात आलेली आहेत. त्यामुळे पडीक क्षेत्र पीकाखाली येत आहे. सदर साधनसामग्रीचा सुयोग्य वापर करुन आपण जमीनीची योग्य व वेळीच मशागत पूर्ण करणे अगत्याचे आहे ज्यामुळे उत्पादन वाढीबरोबरच जमीनीची प्रत सुधारणार आहे.

शेती उद्योगासोबत दुग्ध व्यवसाय, शेळी पालन, कुक्कुट पालन, मत्स्योत्पादन, बीजोत्पादन, अळींबी उत्पादन इत्यादी शेती पूरक व्यवसायामुळे बंद्यांना रोजगार निर्मिती होत असुन त्यांचे शिक्षा समाप्तीनंतर सदर ज्ञानाचा त्यांचे योग्य पुनर्वसनासाठी निश्चितच फायदा होणार आहे. कारागृहात बंद्याना रोजगार संधी उपलब्ध व्हावी म्हणुन कारागृह इतिहासात प्रथमच कृषी महाविद्यालय पुणे येथे रु.२०१/- प्रतिदिन प्रतिबंदी दराने दररोज ३० ते ४० बंद्याना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. चला बंद्याच्या सुधारणा व पुर्नवसनातुन कारागृह शेती उत्पादन वाढवून कारागृह महसुलात वाढ करुया.

**- डॉ भूषण कुमार उपाध्याय, भा.पो.से.**





## कारागृह शेती विभागातून सर्वोच्च उत्पादन

महाराष्ट्र कारागृह विभागातर्गत एकुण ५४ कारागृहापैकी ३ मध्यवर्ती कारागृहे, १४ जिल्हा कारागृहे तर १२ खुले कारागृहे असे एकुण २९ कारागृहात शेती उतपादन घेण्यात येते. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.३,८६,३१,४१९/-(रु.३.८६ कोटी) एवढया रकमेचे आतापर्यत सर्वाधिक शेती उत्पादन घेण्यात आले. कारागृह शेतीसाठी खर्च रु.२,२६,७६,४९१/-(२.२७ कोटी) झालेला आहे. कारागृह उत्पादनातुन खर्च वजा जाता निव्वळ नफा रु.१,५९,५४,९२८/-(रु.१.५९ कोटी) प्राप्त झालेला आहे.

खुले कारागृहातर्गत पैठण कारागृहाने रु.८४,५०,०५७/-सर्वाधिक तर विसापूर कारागृहाने रु.६१,३७,५५५/- शेती उत्पादन प्राप्त केले आहे. जिल्हा कारागृहातर्गत सर्वाधिक रु.४,३४,५२३/- रकमेचे उत्पादन उस्मानाबाद कारागृहाने काढले असुन त्याचे खालोखाल बुलढाणा कारागृहाने रु.३,५९,३५६/- रकमेचे उत्पादन काढले आहे. मध्यवर्ती कारागृहातर्गत येरवडा कारागृहाचे रु.२६,२४,८५५/- तर कोल्हापूर कारागृहाचे रु.८,५३,७७४/- रकमेचे उत्पादन काढले आहे.

कारागृह शेती उत्पादनात भाजीपाला व अन्नधान्य व्यतिरिक्त फळे, दुध, कुक्कुटपालन,शेळीपालन,मत्स्यपालन,आळींबी उत्पादन, चारा उत्पादन व शेणखत इत्यादी बार्बीचा अंर्तभाव आहे. येरवडा खुले कारागृह बंद्याना कृषी महाविद्यालय,पुणे तसेच पैठण मोर्शी कारागृहातील बंदी शासकीय कार्यालयात कामकाजासाठी जात असल्याने रोजगार संधी निर्मितीबरोबरच कारागृह महसुलात देखील वाढ होत आहे. कारागृहाचे ताब्यातील जमीन जास्तीत जास्त पिकाखाली आणणे व शेतीपुरक जोडधंद्यामधून रोजगार निर्मिती व कारागृह महसुल वाढीसाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**श्री. संजय फडतरे, तंत्र अधिकारी (कारागृह शेती)**

---



## कारागृह विभागात कुक्कुट पालन




कारागृह शेती उत्पादनात भाजीपाला व अन्नधान्य,फळे याव्यतिरिक्त दूध, कुक्कुटपालन, शेळीपालन, मत्स्यपालन, आळींबी उत्पादन इत्यादी शेतीपूरक जोडधंदे सुरु करुन बंद्याना रोजगार निर्मिती करुन त्यांचे ख-या अर्थाने सुधारणा व पुनर्वसन केले जाते.

येरवडा व विसापूर कारागृहात यापूर्वीच मांसल कोंबडी उत्पादन घेण्यात येत असुन नुकतेच येरवडा कारागृहात अंडी उत्पादन उद्योग सुरु करण्यात आला आहे. वेंकटेश्वरा हॅचरीज प्रा.लि.मार्फत येरवडा कारागृहास अंडी देणा-या कोंबडयाची पिले मोफत पुरवठा करण्यात आली आहेत.त्यानुसार कारागृहाकडील उपलब्ध व निकामी साधनसामग्रीचा बंद्याच्या मदतीने सुयोग्य वापर करुन अंडी देणा-या कोंबडयांचे संगोपन करण्यात येत आहे.सद्यस्थितीत अंडी उत्पादन सुरु झालेले असुन रु.५/- प्रति नग दराने अंडी विक्रीतुन कारागृह महसुलात वाढ होत आहे.या कामी कारागृह अधिक्षक श्री.जगताप,कृषी सहाय्यक श्री.गायकवाड यांनी बंद्यांच्या मदतीने विशेष योगदान दिलेले आहे.

---

## अमरावती मध्यवर्ती कारागृह

अमरावती मध्यवर्ती काररगृहामध्ये बंदीजनांकरीता कारागृह अधीक्षक श्री रमेश कांबळे यांचे मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज आश्रम संचलित **'ग्रामगीता जीवन विकास परीक्षा'** अयोजित करण्यात आली होते. सदर परीक्षेत २५ बंदीजनंनी आपला सहभाग नोदविला होता. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या बंदीबांधवांना दि. २५.०९.२०१८ रोजी प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी सौ. पुष्पाताई बोंडे, डॉ. विजयराव बोंडे, श्री अभिनंदन पेंढारी, श्री गुलाबराव खवसे, श्री गोपाल कडू, डॉ वसंतराव गणोरकर, श्री नितीन गाणोरकर, श्री आशिष तरार, श्री धनंजय शेगोकार, श्रीमती तापकिरे, श्री जितेंद्र कोरडे, श्री अजय श्रृंगारे, श्री अंकित खांडेकर इ. संस्थेचे पदाधिकारी तर कारागृह अधीक्षक श्री. रमेश कांबळे, तुरुंगाधिकारी श्री बी.एस.संदानशिव, शिक्षक श्री भूषणकुमार कांबळे ,सुभेदार श्री लांडे हे उपस्थित होते.

## येरवडा मध्यवर्ती कारागृह



### “तिनका तिनका तिहार” पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रम



दिनांक २१ एप्रिल २०१८ रोजी कारागृह प्रशासन व मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने येरवडा मध्यवर्ती कारागृहामध्ये तिहार कारागृहातील महिला बंदींनी स्वतःच्या अनुभव विश्वातील वस्तुस्थितीवर आधारीत लिहिलेल्या नाविन्यपूर्ण कवितांवर आधारीत लिहिण्यात आलेले “तिनका तिनका तिहार” या पुस्तकाचे प्रकाशन अपर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा डॉ भुषण कुमार उपाध्याय यांच्या हस्ते करण्यात आले.

सदर कार्यक्रमाची प्रस्तावना मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे या संस्थेतील श्रीमती योजना यादव यांनी केली. तसेच लेखिका श्रीमती वर्तिका नंदा, श्री. अखिल मेहता व अपर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा डॉ भुषण कुमार उपाध्याय, कारागृह उपमहानिरीक्षक श्रीमती स्वाती साठे यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच सदर कार्यक्रमाच्या वेळी तिहार कारागृहावर आधारीत सांगितिक चित्रफितीचे सादरीकरण करण्यात आले. कारागृह अधीक्षक श्री. यु.टी. पवार यांनी आभार प्रदर्शन केले, तर शिक्षक श्री. एन.आर. शिंदे यांनी सुत्रसंचालन केले.

---

## श्री. राजू श्रीवास्तव यांचा “किंग ऑफ कॉमेडी” कार्यक्रम








दिनांक ५ एप्रिल २०१८ रोजी महाराष्ट्र कारागृह प्रशासनतर्फे श्री. राजू श्रीवास्तव यांचा “किंग ऑफ कॉमेडी” हा विनोदावर आधारित कार्यक्रम येरवडा मध्यवर्ती कारागृहामध्ये घेण्यात आला. सदर कार्यक्रमामध्ये श्री. राजू श्रीवास्तव यांनी समाजातील सद्यस्थितीतील वस्तुस्थितीवर आधारीत विविध मुद्दे कॉमेडीच्या स्वरूपात सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

सदर कार्यक्रमप्रसंगी अपर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा डॉ भूषण कुमार उपाध्याय, कारागृह उपमहानिरीक्षक श्रीमती स्वाती साठे, कारागृह अधीक्षक श्री. यु.टी. पवार यांच्यासह कारागृह अधिकारी-कर्मचारी तसेच बंदी बांधव उपस्थित होते. कारागृह अधीक्षक श्री. यु.टी. पवार यांनी आभार प्रदर्शन केले, तर शिक्षक श्री. एन.आर. शिंदे यांनी सुत्रसंचलन केले.

---

## आंतराराष्ट्रीय किर्तीचे सुप्रसिध्द तालवादक श्री. शिवमणी यांचा संगीतमय कार्यक्रम






दिनांक २४ फेब्रुवारी २०१८ रोजी महाराष्ट्र कारागृह प्रशासन व भोई प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रेरणापथ उपक्रम अंतर्गत आंतरराष्ट्रीय किर्तीचे सुप्रसिध्द तालवादक श्री. शिवमणी यांचा ड्रम व इतर वाद्य यावर आधारीत सदाबहार संगीतमय कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमामध्ये श्री. शिवमणी यांनी ड्रम व इतर वाद्य यावर महाराष्ट्र, पंजाब, आंध्रप्रदेश आणि गुजरात राज्यातील वादनाचे वेगवेगळे ताल सादर करून उपस्थित सर्वांची मने जिंकली.

सदर कार्यक्रमप्रसंगी विशेष पोलिस महानिरीक्षक (मुख्यालय) डॉ. विठठलराव जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच कारागृहातील पुरूष व महिला कर्मचारी आणि बंदीबाधवांनी श्री. शिवमणी यांनी संगीतबध्द केलेली विविध सदाबहार गीते सादर केली. कारागृह अधीक्षक श्री. यु.टी. पवार यांनी आभार प्रदर्शन केले, तर शिक्षक श्री. एन.आर. शिंदे यांनी सुत्रसंचालन केले.



## नागपूर मध्यवर्ती कारागृह

### सॅनिटरी नॅपकिन्स निर्मिती उद्योग



नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे कारागृह विभाग व टाटा ट्रस्ट यांचे संयुक्त विद्यमाने महिलांच्या आरोग्यासाठी अत्यावश्यक असलेल्या 'सॅनिटरी नॅपकिन्स निर्मिती उद्योग प्रकल्प' सुरु करण्यात आला आहे. श्री योगेश देसाई, कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग नागपूर यांचे हस्ते सदरच्या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. तत्पूर्वी कारागृहातील महिला बंद्यांना नॅपकिन्स तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते. सदरच्या उद्योगासाठी सध्या कारागृहात पाच मशिन्स बसविण्यात आलेल्या आहेत. या मशिन्सच्या माध्यमातून दिवसाला एक ते दिड हजार सॅनिटरी नॅपकिन्स तयार करण्यात येतील. कालांतराने नॅपकिन्सच्या उत्पादनात वाढ करण्यात येईल. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी कारागृह अधीक्षक श्रीमती राणी भोसले, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री ए. आर. गावित, कारखाना व्यवस्थापक श्री आर. आर. भोसले आणि टाटा ट्रस्टच्या प्रकल्प संचालक श्रीमती वर्षा कनिकदळे उपस्थित होते.

कारागृहामध्ये सॅनिटरी नॅपकिन्स निर्मितीचा हा पहिलाच उपक्रम असून राज्यभरातील सर्व कारागृहातील महिला बंद्यांना येथून सॅनिटरी नॅपकिन्सचा पुरवठा करण्यात येईल. बाजारातील नॅपकिन्सच्या तुलनेत कारागृह निर्मित नॅपकिन्सची किंमत कमी असल्याने शासनाच्या निधीची बचत होईल.

---



## मुंबई मध्यवर्ती कारागृह

### किर्तन कार्यक्रम



मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे श्री. विठ्ठल जाधव, विशेष पोलीस महानिरीक्षक, (मुख्यालय) पुणे यांच्या प्रेरणेने राष्ट्रीय किर्तनकार ह.भ.प. आत्माराम शास्त्री महाराज यांच्या किर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास मा. श्री. विठ्ठल जाधव साहेब, श्री. हर्षद अहीरराव, अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह तसेच कारागृह अधिकारी/कर्मचारी व मोठया संख्येने बंदीजण उपस्थित होते.

---



### संगीत से मानसिक तणावमुक्ती



मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे श्री. राजवर्धन साहेब, विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) दक्षिण विभाग, मुंबई यांच्या प्रेरणेने व श्री. हर्षद अहीरराव, अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांच्या मार्गदर्शनाखाली खेरवाडी सामाजिक संस्थेच्या सहकार्याने बंद्यांसाठी ''संगीत से मानसिक तणावमुक्ती'' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमा मध्ये प्रसिध्द संतुरवादक श्री. विवेक जोशी यांनी संगीताच्या माध्यमातुन देखील तणावमुक्ती मिळु शकते, याचा अनुभव बंद्यांना तसेच कारागृह अधिकारी/कर्मचारी यांना दिला.

---

**मा. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे मान्यतेने प्रकाशित**

**निर्मिती :- श्रीमती रजनी कलश मोटके, शिक्षिका**

**अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षणालय, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**